

मैं तो आरती उतारू रे...
गरबागीतं



हिंदी चित्रपटांना अर्थपूर्ण गीतं देणारे
कवी प्रदीप

हिंदी चित्रपटगीतांत सणावारांची गीतं हमखास आढळतात. त्यात नाच-गाण्याची संधी देणारी गरबागीतं ही तर कलाकारांनाही सुवर्णसंधी वाटावी. अशाच गरबागीतांची ही झलक...

□ अजित पोपट



टीपरीवरी टीपरी पडे...

'एक दिवस एक अपरिचित माणूस मला भेटायला आला आणि म्हणाला, मी सतराम रोहरा. त्याच्या चेहऱ्यावरून तो रो रहा वाटत होता', गीतकार आणि गायक प्रदीपकुमार यांनी एक आठवण सांगताना हा प्रसंग सांगितला. ते पुढे म्हणाले, 'सतरामकडे एक धार्मिक कथानक होतं. पण माझ्यासाठी तो विषय अगदीच नवा होता. कारण कोणत्याही पुराणातून किंवा कथांमधून मी देवीमहात्म्य ऐकलं नव्हतं. पण त्यांच्या आग्रहाखातर त्यांना कथेला अनुसरून गीतं लिहून दिली आणि त्या चित्रपटाला अनपेक्षितपणे यश मिळालं.'

एवढ्यावरून तुमच्या लक्षात आलं असेल की आम्ही कोणत्या चित्रपटासंदर्भात बोलत आहोत ते. चित्रपटाचं नाव होतं *जय संतोषी माता*. या चित्रपटातील संतोषी मातेची आरती लोकप्रिय झाली ती त्याच्या चालीमुळे. तीही प्रदीपकुमारना अजाणतेपणे सुचवलेली. 'मा पावा ते गढथी उतऱ्या महाकाली रे, मा परवरियां गुजरात पावावाळी रे...' गेली अनेक वर्षं गुजरातेतल्या घराघरात देवीची ही आरती भक्तिभावाने गायली जातेय. त्याच चालीवर 'मैं तो आरती उतारू रे संतोषी माता की...' हे गाणं तयार केलं.

इथे आज देवीच्या गीतांची आठवण करण्याचं प्रयोजन असं की लवकरच नवरात्रीचा उत्सव येत आहे. हिंदी चित्रपटांत तशी प्रत्येक सणाला उद्देशून काही गीतं आढळतातच. तशी देवीची महती सांगणारी चित्रपटगीतंही बरीच आहेत. गीतांजलीत आपण अशीच काही गरबागीतं किंवा देवीच्या गीतांचा विचार करणार आहोत.

खरं तर आम्ही संभ्रमात होतो. 'जी-चित्रलेखा'चे हितचिंतक कल्याणजीभाई यांनी त्या प्रसंगाचं वर्णन करताना एकदा म्हटलं होतं. आय.एस.जोहर आणि मेहमूद या दोन विनोदवीरांचा चित्रपट *जोहर मेहमूद इन गोवा*. या चित्रपटाची गीतं आणि संगीतही फार हिट होतं. तर चित्रपटाच्या संगीतावर काम चालू असताना लोकांचे लाडके गायक हेमू गढवी आम्हाला भेटायला स्टुडियोत आले होते. त्यांच्याशी गप्पा चालू असताना मेहमूदने सहज म्हटलं, आपणही एखाद्या चित्रपटात गरबागीत ठेवायला हवं...

ही घटना नंतर विसरण्यात गेली असं वाटलं. *जोहर मेहमूद इन गोवा* १९६५मध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर आम्ही *उपकार* आणि इतरही अनेक चित्रपट केले. कामाच्या गडबडीत आम्ही वर उल्लेख केलेला प्रसंग पार विसरलो. पण १९७१च्या दरम्यान मेहमूद जोहरसह भेटायला आला आणि म्हणाला, आम्ही *जोहर मेहमूद इन हाँगकाँग* चित्रपट बनवतोय. त्यात आम्हाला एक गरबागीत हवं होतं.

आता बोला. मेहमूद जोहर दोघेही कॉमेडियन. त्यात चित्रपट हाँगकाँगमध्ये घडणाऱ्या कथानकावर आधारित. त्यात गरबा कुठे बसवणार? पण आमचं काही ऐकू घ्यायलाच मेहमूद तयार नव्हता. त्याचं आपलं एकच पालुपद, मला यात गरबागीत हवं आहे. दिग्दर्शक एस. ए. अकबरनेही त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याने काही ऐकून घ्यायचंच नाही असा जणू निश्चय केला होता. अखेरीस कल्याणजीभाईंनी एक गीत तयार केलं. दिग्दर्शकाने त्यानुसार कथानकात फेरफार केले आणि महंमद रफी, मुकेश आणि कोरसच्या आवाजात ते गीत पडद्यावर साकार झालं: 'हे माई जब जब भीड पडी... आयो आयो नवरात्री त्योहार...'

हिंदी चित्रपट संगीतात गुजराती संगीताचा प्रभाव बऱ्यापैकी आहे. कारण १९४०च्या दशकात हिंदी चित्रपटात गुजराती लोकांचा दबदबा होता. मनमोहन आणि सुभाष देसाई यांचे पिता किकुभाई देसाई, सरदार चंदुलाल, विजय भट, महेश भटचे पिता नानाभाई भट, बाबुभाई मिस्त्री, सोहराब मोदी वगैरे मंडळींच्या शब्दाला वजन होतं. पण गुजरातच्या


अशी दृश्यं तर हिंदी पडद्यावर नेहमीच दिसतात.

लोकसंगीताचा पहिलावहिला नोंद घेण्याजोगा उपयोग संगीतकार नौशाद यांनी केला. ए.आर.कारदारचे सहाय्यक असलेल्या नौशादने बाबुल चित्रपटात गुजराती लोकसंगीताचा अत्यंत खुबीने वापर केला होता. नरगीसवर चित्रित या गीतात ती आपल्या मैत्रिणींसह टाळ्या वाजवत हे गीत गातेय. गाण्याचे बोल होतेः 'छोड बाबुल का घर आज पी के नगर मोहे जाना पडा हो हो हो आज जाना पडा...'

या गाण्याचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात सुखाची आणि करुणेची दोन्हीची झलक पाहायला मिळते. अशाप्रकारे संगीताचा वापर करण्यात आला आहे. शीर्षकगीत म्हणून या गाण्याला मिळालेली लोकप्रियता लक्षणीय होती. एकाच गीतात सुख आणि दुःख या दोन्ही भावनांचा संगम दाखवण्याची पद्धत तेव्हापासून चित्रपटसंगीतात रूढ झाली हेही इथे नमूद करायला हवं. या गाण्यातील करुण रसासाठी गुजराती लोकसंगीताचा उपयोग केला.

गुजराती लोकसंगीतावर आधारित या गीतातील उत्तरार्धाप्रमाणेच आणखी एक गीत नौशादने *मदर इंडियात* दिलं होतं. अर्थात, या गाण्याचा आग्रह दक्षिण भारतातून मुंबईला आलेल्या निर्माता मेहबूब खान यांनी धरला होता. गीत होतं, 'पी के घर आज प्यारी दुल्हनिया चली...'.


तर देवीच्या गीतांना चाल देताना गुजराती लोकसंगीताचा वापर आणखी दोन गुजरात्यांनी केला. चित्रपट निर्माता धीरूभाई देसाई आणि जसवंत झवेरी. हे दोघंही 'चित्रलेखा' परिवाराचे संस्थापक वजुभाई कोटक यांचे चांगले मित्र होते. आजची पिढी सुपरस्टार अमिताभची आई म्हणून जिचा गौरवाने उल्लेख करतो त्या निरुपा रॉय (मूळ नाव कोकिला बलसारा) यांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात धार्मिक चित्रपटाने केली होती. *जय महाकाली* (१९५१ दिग्दर्शक धीरूभाई देसाई), *शिवकन्या* (१९५४ दिग्दर्शक तेच), अमरसिंह राठोड (१९५७ दिग्दर्शक जसवंत झवेरी), *जय अंबे* (१९५७ दिग्दर्शक शांतीकुमार)... यातल्या बऱ्याच चित्रपटांत निरुपा रॉय नायिका होती.

यातल्या जवळपास प्रत्येक चित्रपटात देवीवर एखादं तरी गीत होतंच. त्यातलेच दोन-चार मुखडे पाहाः 'जय महाकाली जय महाकाली रिद्धीदायिनी...', 'हे मैया भवानी, हे दुर्गा भवानी, हे अंबा भवानी...' (दोन्ही गीतं *जय*



धार्मिक चित्रपटातून अभिनयप्रवासाची सुरुवात.

महाकाली चित्रपटातली आहेत), 'जय हे दुर्गामाता जय जय...' (*दुर्गापूजा*), 'जय दुर्गे जय दुर्गे आज वरदान दे दे...', 'जय अंबे जगदंबे धधक उठी ज्वाला चिता की...' (दोन्ही गीतं *शिवकन्या* चित्रपटातली) आहेत. *शिवकन्या* चित्रपटाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात संगीतकार म्हणून काम पाहिलं गायक मन्ना डे यांनी. धीरूभाई देसाईंनी त्यांना संगीत देण्याविषयी गळ घातली आणि मन्नादादा त्यांची विनंती नाकारू शकले नाहीत. याबाबत मन्नादादांना छेडलं असता ते इतकंच सांगतात, ती दोन्ही गीतं वीर रस आणि रौद्र रसप्रद गीतं होती. याच धर्तीवर मगाशी उल्लेख केलेल्या *जय महाकाली* चित्रपटातलं एक गीत आहे. यात कृष्णाच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेल्या शाहू



मोडक आणि सुलोचनाने गायलेलं एक गीत आहे 'जय महाकाली जय जय महाकाली...' तर दुसरं गीत 'मैया भवानी...' गीता दत्तच्या आवाजातलं आहे.

रौद्र रसाविषयी बोलताना १९५५मध्ये प्रदर्शित झालेल्या *नवरात्री* या चित्रपटात चित्रगुप्ताने दोन गीतं दिली होती. दोन्ही गीतं ऐकणाऱ्याच्या अंगात वीरश्री जागृत करतील अशी होती. एका गीतात गीतकाराने शक्तिपूजेच्या गुप्त मंत्राचा खुबीने वापर केलेला आहे. त्याचा मुखडा असा आहेः 'ॐ ऱ्हीं क्लीं अंबिके, सिंधु की हुं कार ले, शेष की फुंकार ले...' आणि 'अंबे तू है जगदंबे काली, जय दुर्गे खप्परवाली...'

जवळपास असाच रौद्र रसाचा उपयोग निर्माता मनमोहन देसाई याने १९७४मध्ये सादर झालेल्या आणि अमिताभ बच्चन-रेखा यांच्या मुख्य भूमिका असलेल्या *सुहाग* चित्रपटात केला होता. आनंद बक्षी लिखित आणि लक्ष्मीकांत प्यारेलालच्या संगीत दिग्दर्शनात या गीताचा मुखडा होताः 'काल के पंजे से माता बचाओ, हो शेरोंवाली, उंचे डेरोंवाली बिगडी बना दे...'

बाकी हातात टिपऱ्या घेऊन गरबा नाचतायत अशी दृश्यं तर कितीतरी हिंदी चित्रपटांतून दिसतात. कथेला अनुसरून गीतांची योजना केली आहे असं आता क्वचित एखाद्या चित्रपटात पाहायला मिळतं. १९८३मध्ये मोहनकुमारचा चित्रपट अवतार यात राजेश खन्ना आणि शबाना आझमी यांनी मुख्य भूमिका केली आहे त्यातलं एक गीत इथे मुद्दाम उल्लेख करावा असं आहे. गीताचे बोल आहेत 'चलो बुलावा आया है माता ने बुलाया है...' नरेंद्र चंचलच्या आवाजातलं हे गीत आणि त्याची चाल आजही आपल्या कानांवर रेंगाळते इतकी अप्रतिम आहे.

इथे पुन्हा एकदा हे स्पष्ट करावंसं वाटतं की गीतांजली या सदरात निवडलेल्या विषयावर आधारित चित्रपटगीतांची एक झलक सादर करण्याचा प्रयत्न केला जातो. सगळ्याच गाण्यांचा परामर्श घेणं शक्य नसतं. कोणत्याही विषयावरची अशी चित्रपटगीतं विचारात घ्यायचं ठरवलं तर शेकडो गाणी सापडतील. पण त्या सगळ्यांचाच उल्लेख करणं जागेच्या अभावी शक्य नसतं. इथे आपण लक्षात घेतो ती आपल्या आठवणीतली गीतं. उदा. 'मैं तो आरती उतारू रे संतोषी माता की...' ●